मराठवाड्यातील असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन (सन २०००-०१ ते २०१४-१५)

प्रस्तावना :

भारतीय अर्थव्यवस्थेची विभागणी प्रामुख्याने दोन भागात झालेली आहे. त्यातील पहिला भाग म्हणजे असंघटित क्षेत्र व दुसरा भाग म्हणजे संघटित क्षेत्र होय. जागतिक पातळीवरील विकासाच्या निकषाचा अभ्यास केला तर असे आढळून येते की, विकसित अर्थव्यवस्थेमध्ये संघटित क्षेत्राचा उत्पादन प्रक्रियेतील वाटा जास्त असलेला दिसून येतो आणि ही अर्थव्यवस्था भांडवलप्रधान अर्थव्यवस्था असलेली दिसून येते. परंतु विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये मुख्यत: शेतीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. त्यामुळे या अर्थव्यवस्थेमध्ये असंघटित क्षेत्राचा वाटा उत्पादन प्रक्रियेत जास्त असल्याचे आढळून येते. जवळपास ७०% कामगार वर्ग हा असंघटित क्षेत्रात असलेला दिसून येतो तर उत्पादनाच्या ४०% उत्पादन या क्षेत्रात होत असते.

विकसित राष्ट्रामध्ये संघटित क्षेत्रात रोजगार निर्मितीचा दर जास्त असतो. त्यामुळेच साहजिकच स्त्रियांचा वाटा सुद्धा संघटित क्षेत्रात जास्त असतो. परंतु भारतासारख्या कृषिप्रधान व लोकसंख्येच्या संसाधनावर जास्त भार असणाऱ्या देशात मात्र चित्र याउलट पहावयास मिळते.

प्राचीन भारताचा इतिहास पाहिला तर स्त्री व पुरुषांना समान मानले जात होते. दोघांनाही व्यवस्थेचा भाग समजले जात होते. परंतु मध्ययुगीन काळात जेव्हा निजामाचे राज्य प्रस्थापित झाले तेव्हापासून भारतीय स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जात असल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच आज स्त्रीला उत्पादित क्षेत्राबरोबरच सेवा क्षेत्रामध्ये सुद्धा काम करावे लागत आहे. सन २००४ ते २०१२ या कालावधीत भारताचा असंघटित क्षेत्रातील वाटा (अकृषी) ८४% असलेला दिसून येतो. या वरील आकडेवारीचे वितरण अभ्यासल्यास ५८% स्त्रिया आणि ५१% पुरुष असे प्रमाण दिसून येते.

दक्षिण आशियातील घरकाम करणाऱ्या स्त्रियांची आकडेवारी पुढीलप्रमाणे-

२००९-१० - बांग्लादेश - २ मिलीयन स्त्री घरकामगार

२०११-१२ - भारत - ३७.४ मिलीयन स्त्री घरकामगार

२००८ - नेपाळ - ०.९२ मिलीयन स्त्री घरकामगार

२००८-०९ पाकिस्तान - १.४३ मिलीयन स्त्री घरकामगार

द.आशियाई देशामध्ये ४१ मिलीयन स्त्री कामगार आहेत.

वरील आकडेवारीवरुन भारत देशामध्ये असंघटित क्षेत्रातील स्त्रि कामगारांचे प्रमाण किती जास्त आहे हे आपणास दिसून येते. त्याचबरोबर अर्थव्यवस्थेमध्ये सामान्यपणे दोन क्षेत्र असलेले दिसून येतात.

१) संघटित क्षेत्र

२) असंघटित क्षेत्र.

या दोन क्षेत्रापैकी संघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न शक्यतो नसतात पण असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न हे जास्त असतात. पण त्यांच्याकडे सौदाशक्ती व संघटन नसल्यामुळे त्यांचे प्रश्न सुटत नाहीत. पण संघटीत क्षेत्रातील कामगारांचे संघटन असल्यामुळे त्यांचे प्रश्न सुटतात (वेतन, कामाचे तास, आरोग्य इ.) भारतामध्ये या दोन क्षेत्राचा सकल प्रमाणे अभ्यास केल्यास ६०% वाटा हा असंघटित क्षेत्राचा असलेला दिसून येतो. तर ४०% वाटा हा संघटित क्षेत्रातील असलेला दिसून येतो. असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगार हे वेगवेगळया क्षेत्रात काम करीत असलेले दिसून येतात. त्यामध्ये वीटभट्टी, बीडी उद्योग, बांगडी उद्योग, दूध उद्योग, बांधकाम उद्योग, कचरा गोळा करणे, भाजीपाला विक्री करणे अशा अनेक क्षेत्रात स्त्री कामगार पुरुषांपेक्षा जास्त दिसून येतात. ४३% महिला कामगार असंघटित क्षेत्रात काम करतात. तसेच भारताच्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये तर स्त्रीया घरकाम करून शेती व्यवसायात काम करतात. स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त दिसून येते. त्याचबरोबर अप्रशिक्षित, सौदाशक्तीचा अभाव, संपत्तीचे असमान वाटप, लिंगभेद अशा अनेक कारणांमुळे स्त्रियांना असंघटित क्षेत्रात विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. विशेषतः कमी वेतन ही तर फार मोठी समस्या दिसून येते.

आपण जर मराठवाड्याचा विचार केला तर मराठवाडा हा निजाम राजवटीचा परिणाम व शोषण झालेला विभाग असलेला दिसून येतो. कारण जर महाराष्ट्राचा भौगोलिक अभ्यास केल्यास शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक परिस्थिती फार प्रतिकूल असलेली दिसून येते. यातून जर मराठवाडा विभागाचा अभ्यास केल्यास महाराष्ट्रापेक्षा फार बिकट परिस्थिती असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांची दिसून येते. म्हणूनच मराठवाड्यातील असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांचा अर्थशास्त्रीय अभ्यास (२००० ते २०१५) हा अभ्यास विषय संशोधनासाठी निवडला आहे.

व्याख्या :

"Informal sector is defined as residual which includes all the private enterprises that are outside the reach of public regulations in the urban economy."

The National Commission on Labour, specifying its difficulties in identifying unorganized labour by any exact took recourse to describing some of their characteristics and constraints, namely a) casual nature of employment b) ignorance and literacy c) small size of establishments with low capital investment per person employed, d) scattered nature of establishments and e) superior strength of the employers operating singly or in combination.

संशोधनाची उद्देश :

प्रस्तुत अभ्यासासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) मराठवाड्यातील असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांचा अभ्यास करणे.

२) मराठवाड्यातील असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांना मिळणाऱ्या वेतनभिन्नतेचा अभ्यास करणे.

३) मराठवाड्यातील असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.

४) मराठवाड्यातील असंघटित क्षेत्रातील मालक व कामगार यांच्यातील सौदाशक्तीचा अभ्यास करणे.

५) असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांच्या पिळवणुकीचा अभ्यास करणे.

६) स्त्री कामगारांचा असंघटित क्षेत्रातील रोजगाराचा अभ्यास करणे.

७) असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांच्या उत्पादनातील हिश्याचा अभ्यास करणे.

८) स्त्री कामगारांचे उत्पन्न व खर्च यांचा अभ्यास करणे.

९) मराठवाड्यातील शैक्षणिक समस्येतून निर्माण झालेल्या रोजगार स्थितीचा अभ्यास करणे.

अभ्यासाची गृहितके

१) असंघटित क्षेत्रात पुरुषांपेक्षा स्त्री कामगारांना वेतन मिळते.

२) भारतात आजही स्त्रियांचे साक्षरता प्रमाण कमी आहे. त्यामुळे त्यांच्यात प्रशिक्षणाचा अभाव आहे.

३) अनेक गरीब कुटुंबातील स्त्रियांचे पति व्यसनाधीन असल्यामुळे स्त्रियांना कुटुंब चालवण्यास स्वतःला काम करावे लागते म्हणजेच जोडीदार काम करत नाही.

४) असंघटित क्षेत्रात स्त्रियांची पिळवणूक होते.

५) अनेक स्त्रियांच्या कुटुंबाचा आकार मोठा आहे. (जबाबदारी निश्चित नसणे.)

६) असंघटित क्षेत्रातील स्त्रियांचे संघटन नसल्यामुळे सौदाशक्ती कमी असते.

७) स्त्री कामगारांचे सामाजिक क्रयशक्ती कमी होत आहे.

अभ्यास पद्धती

प्रस्तुत अभ्यास प्रामुख्याने दोन पद्धतीचा अवलंब करून करण्यात येणार आहे.

१) प्राथमिक पद्धती :

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. अभ्यासासाठी प्रत्येक जिल्ह्यातून ७५ नमुने निवडण्यात येणार आहे. म्हणजेच प्रत्येक जिल्ह्यातून ७५x८=६०० असंघटित स्त्री कामगारांचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील तीन तालुके नमुना म्हणून निवडण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यातून २५ नमुने निवडले

जाणार आहेत. तालुके निवडत असताना मानव निर्देशांकानुसार प्रत्येक जिल्ह्यातील तीन तालुक्याची निवड केली जाणार आहे. त्यामध्ये आरोग्य शिक्षण त्याचबरोबर मानव निर्देशांकानुसार निवड करीत असताना साक्षरता, रोजगार, आरोग्य, उच्च विकास, मध्यम विकास, अल्प विकास हा घटक लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्यातून तीन तालुक्याची नमुना निवड पद्धतीने निवड केली जाणार आहे. त्याचबरोबर सामाजिक घटकाचा विचार करता समाजातील कोणत्या घटकाला जास्त प्रमाणात असंघटित क्षेत्रात काम करावे लागत आहे व शिक्षणाच्या संधीमुळे त्यामध्ये कसा बदल झाला आहे याचा अभ्यास केला जाणार आहे. कारण यातून सामाजिक विदारक समस्या मराठवाडयातील असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगाराची दिसून येईल. ज्याप्रमाणे तालुक्याची निवड केली जाणार आहे त्याचप्रमाणे कुटुंबाचीसुध्दा निवड ही मानव निर्देशांकानुसार केली जाणार आहे.

२) द्वितीय पद्धती :

या पद्धतीत प्रकाशित ग्रंथ,शासकीय अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना अहवाल, शासनाचे गॅझेटीअर, जिल्हा साख्यिकीय कार्यालयातील माहिती, कामगार विभागाचे अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे आदीतून माहिती संकलित करण्यात येऊन त्याचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण आराखडा (मांडणी)

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - अभ्यास पद्धती आणि पुर्व अभ्यासाचे सिंहावलोकन

प्रकरण तिसरे - मराठवाड्यातील असंघटित क्षेत्राचा अभ्यास

प्रकरण चौथे - स्त्री कामगारांच्या कामाचे स्वरूप

प्रकरण पाचवे - असंघटित स्त्री कामगारांचे मराठवाडा विकासातील योगदान

प्रकरण सहावे - स्त्री कामगारांवरहोणारे आर्थिक परिणाम

प्रकरण सातवे - निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ सूची

1) विना मुजुमदार (संपा.) भारतातील महिला कामगार, चाणक्य पब्लिकेशन, पुणे, १९९०.

2) मैत्रेयी कृष्णराज (संपा.) भारतीय स्त्रीचा अभ्यास, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

3) Boserup Easter : 'Women's Role in Economic Development', Earthscan Publication Ltd., London, 1970

4) International Labour Office, 'Equal Opportunities and equal treatment for men and women employment', 71st session, 1985

5) Urmila Phadnis and Indira Malani (Ed) : 'Women of the World : Illusion and Reality', Vikas Publishing House, Delhi, 1978

6) Joyce Lebra (Ed.) : 'Women and Work in India : Continuity and Change', Oremilla & Co. Publishers, New Delhi, 1984

7) Banerjee Nirmal: 'Indian Women and urban labour market', Labour Capital and Society, April 1979 Vol.12 No.2

8) Nandini Azad : 'Empowering Women workers', The working women's Forum, Experiment in Indian Cities, Mylapore, Madras

9) Irene Tom : 'Women in Unorganized Sector', Usha Publications, New Delhi.

10) Sethuraman, S.V. : 'The urban informal sector in developing countries; Employment, Poverty and Environment', International Labour Office, Geneva.

संशोधक

प्रा.राठोड उल्हास सखाराम

अर्थशास्त्र विभागप्रमुख

पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय,

देवणी जि.लातूर

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.पुरुषोत्तम गाटे

अर्थशास्त्र विभागप्रमुख

कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर

महाविद्यालय, उमरी जि.नांदेड